M T W T F S S Page No: Date: YOUVA

सुभाषित

॥श्री॥

दीपज्योतिः परब्रह्म दीपज्योतिर्जनार्दनः।
दीपो हरति पापानि संध्यादीप नमोऽस्तु ते॥

- दीपक हे परब्रह्माचे स्वरूप आहे. दीपक संपूर्ण विश्वाचा उद्धार करणाऱ्या जनार्दनाचे रूप होय. दिवा पापांचा नाश करणारा आहे अशा पापांचा नाश करणाऱ्या सायंकालीन दिव्याला नमस्कार असो.

प्रकाश हा अज्ञानाचा नाश करणारा अंधार नाहीसा करणारा असतो. अज्ञानाचा नाश ज्ञानरूपी प्रकाशाने होतो. त्याचप्रमाणे रात्रीच्या अंधाराचा नाश करणारा दिवा प्रकाश देणारा आश्वासक मानला जातो. संध्याकाळच्या कातर वेळी जेव्हा प्रकाश हळूहळू कमी होत जातो व अंधाराचे साम्राज्य जगताचा ताबा मिळवू पहाते तेव्हा संध्यादीप अंधारातही प्रकाश पुरवत रहातात. प्राचीन काळापासूनच अंधाराशी अज्ञाताच्या, अशुभाच्या, अज्ञानाच्या संबंध जोडला गेला या अंधारातून प्रकाशाची वाट दाखवणारा जीवांना आश्वासक ठरणारा दिवा मग तो प्रकाशाचा असो अथवा अज्ञानरूपी कोळोखाचा नाश करणारा ज्ञानदिवा असो समस्त जीवांसाठी कायमच वंदनीय ठरला आहे. हा अंधाराचा तमोगुणाचा नाश करणारा दिवा म्हणूनच सत्यस्वरूप दाखवणाऱ्या परब्रह्माचा अंश मानला गेला आहे. जे ज्ञानाचा प्रकाश आहे तेथे पापाला थारा नसतो त्यामुळे दीपक पापनाशक मानला गेला आहे. प्रकाशाची वाट दाखवणाऱ्या दिव्याची तुलना म्हणूनच जनार्दनाशी केली जाते अशा या अंधाराचा नाश करणाऱ्या दिव्याला वंदन असो ~~हा~~ अशी कवी श्रद्धापूर्वक प्रार्थना करतो आहे.

सर्वांना मंगलमय दीपोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!!



सौ. लिना धोपावकर

